**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**

प्लॉट नं.१, सेक्टर-१५, कोळगाव, पालघर-नवनगर,
जिल्हा-पालघर., दुरध्वनी-०२५२५-२५११००(कार्यालय)
E-mail : sp.palghar@mahapolice.gov.in


## प्रेसनोट क्र.६८ दिनांक २९.११.२०२२

## महाराष्ट्र पोलीस शिपाई पद भरती - २०२१ आवेदन अर्ज मुदतवाढीच्या अनुषंगाने

महाराष्ट्र पोलीस शिपाई पदभरती -२०२१ च्या अनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई या संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया नियोजित आहे. त्याअनुषंगाने दि.०६.११.२०२२ रोजी वृत्तपत्रांचे माध्यमातुन तसेच महाराष्ट्र पोलीस दलाचे ***www.mahapolice.gov.in*** या अधिकृत संकेतस्थळावर व पालघर जिल्हा पोलीस दलाचे ***www.palgharpolice.gov.in*** या अधिकृत संकेतस्थळाचे माध्यमातुन प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर माध्यमातुन प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीद्वारे पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई या संवर्गातील पदभरती करीता आवेदन अर्ज भरण्यासाठीचा अंतिम दिनांक ३०.११.२०२२ असा निश्चित करण्यात आलेला होता. त्यामध्ये बदल करुन पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई या संवर्गासाठी पदभरतीसाठी उमेदवाराने अर्ज भरण्यासाठी ***दिनांक १५.१२.२०२२ पर्यंत मुदतवाढ*** देण्यात येत आहे.